





# चेहऱ्यावरील नसतंतूंचा दाह आणि होमिओपॅथिक उपचार




अलीकडे नुकतीच एक बातमी वाचली आणि लक्षात आले सलमान खान या अभिनेत्याला Trigeminal Neuralgia या व्याधीने ग्रासले होते. बरेच औषधे घेऊन देखील त्याच्या चेहऱ्यातील नसांच्या यातना आटोक्यात आल्या नाहीत. शेवटी त्याला अमेरिकेत जाऊन या व्याधीसाठी महागडी शस्त्रक्रिया करावी लागली. तर Trigeminal Neuralgia म्हणजे नेमकं काय? आणि त्यावर होमिओपॅथिक उपचारामुळे बरी झालेली केस सविस्तर देत आहोत.

Trigeminal Nerve ही पाचव्या क्रमांकाची मस्तिष्क चेता आहे. जी चेहऱ्यावरील संवेदना पोहोचवण्याचे आणि चेहऱ्याशी निगडित हालचाली करण्याचे काम करते. ह्या चेताच्या तीन शाखा- Ophthalmic, Maxillary Afd¯f Mandibular आहेत. Opthalmic चेता कपाळ, डोळे व डोळ्याची वरची पापणी, नाक यांकडील संवेदना मेंदूकडे पोहोचवण्याचे काम करतात. Maxillary चेता डोळ्याची खालची पापणी, गाल, वरचा ओठ, वरचे दात आणि हिरड्या, नाकपुड्या, चेहऱ्यातील हवेच्या पोकळ्या आणि मस्तिष्क आवरण येथील संवेदनांचे प्रदान करण्याचे काम करतात. Mandibular चेता खालचा ओठ, खालचे दात आणि हिरड्या, हनुवटी आणि जबडा, कान आणि मस्तिष्क आवरणाचा काही भाग येथील संवेदना प्रदान करण्याचे काम करते. या चेताद्वारे तोंडाजवळील स्पर्शज्ञान, तापमानाचे ज्ञान व वेदनेचे ज्ञान होते. या तिन्ही चेता चेहऱ्याच्या स्नायूंशी निगडित असतात. ज्याद्वारे चावणे, अन्न खाणे शक्य होते. Trigeminal Neuralgia म्हणजे तिन्हीपैकी कुठल्याही शाखेमध्ये दाह निर्माण होणे, ज्यामुळे चेहऱ्यावर प्रचंड प्रमाणात वेदना सुरू होतात.

**कारणे :-**

१. Idiopathic या आजाराचे ठाम कारण नाही.

२. ही चेता तिच्या उगमस्थानी तिच्या बाजूलाच असलेल्या धमणीमुळे दाबल्यामुळे असा दाह निर्माण होतो.

३. या चेतातंतूचे आवरण खराब होणे (Demelination)

३. मस्तिष्काच्या पाठच्या बाजूत असलेल्या ट्यूमरमुळे, मल्टिपल स्क्लेरॉसिस, धमणीच्या आवरणात फुगवटा निर्माण होऊन या चेतावर दाब आल्यामुळे असा दाह निर्माण होऊ शकतो.

**लक्षणे:-**

१. जी शाखा दबली गेली असेल त्या शाखेशी निगडित कार्याशी संबंधित लक्षणे दिसून येतात.

२. या व्याधीमध्ये चेहऱ्यावर अचानक तीव्र स्वरूपात वेदना सुरू होतात. ज्या काही सेकंद किंवा मिनिटांपर्यंत सुरू राहतात. दैनंदित क्रिया जसे की, जेवताना, बोलताना, दात घासताना, शेविंग करताना या अशा साध्या साध्या बाबींमुळे या वेदना सुरू होतात. त्यामुळे रुग्ण त्रस्त होतो. त्यांचे जीवनमान विस्कळीत होते. रुग्णाची वेदनेची संवेदनशीलता स्पर्शाने, वाऱ्याच्या झोताने किंवा आवाजाने वाढते. विजेचा धक्का बसल्यासारख्या, पोळणे, लहरींसारखा, ठणका बसल्यासारख्या, तीव्र वेदना होतात. हळूहळू या वेदनांची तीव्रता आणि वारंवारता वाढत जाते. सुरुवातीला चेहऱ्याच्या एकाच बाजूला होणाऱ्या वेदना कालांतराने दुसऱ्या बाजूलासुद्धा सुरू होतात. एकाच वेळी दोन्ही बाजूंच्या चेतांचा समावेश असेल आणि ह्या वेदना झटपट वाढत असतील तर मस्तिष्कातील ट्यूमर किंवा मल्टिपल स्क्लेरॉसिस हे या व्याधीचे कारण असू शकते. ह्या व्याधीमध्ये होणाऱ्या वेदनांमुळे रुग्ण त्रासलेला असतो. ज्याचे कारण ठोसपणे सांगता येत नाही. या आजारावर शस्त्रक्रिया करणे खूपच किचकट आहे. कारण ते अतिसूक्ष्म मस्तिष्कच्या आतील भागांशी निगडित आहे.

**केस -**

ही एका ५५ वर्षांच्या महिलेची केस आहे. माझ्या कन्सल्टिंगमध्ये येताना त्या गालावर हात ठेवून आल्या. त्यांनी बोलायला सुरुवात केली आणि लगेच त्यांना चेहऱ्यावर वेदना सुरू झाल्या. त्यांच्या वेदना इतक्या दाहक होत्या की, त्यांना पाणी पिणे, बोलणे, जेवणे अशक्य झाले होते. स्वतःबद्दलची माहिती देताना त्यांना एकही वाक्य वेदनेमुळे पूर्ण करता येत नव्हते. या आजाराला Trigeminal Neuralgia म्हणतात. या आजाराबरोबरच त्यांना रक्तदाब व हृदयाला रक्तपुरवठा कमी होणे या तक्रारी होत्या. Trigeminal Neuralgia या व्याधीवर सतत औषधोपचार करूनही काहीच फरक पडत नसल्यामुळे शेवटी त्यांना शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला होता. शस्त्रक्रियेचे दुष्परिणाम माहीत असल्यामुळे त्यांनी अखेर होमिओपॅथिक उपचार घेण्याचे ठरवले आणि त्या माझ्याकडे आल्या.

**तक्रारी :-**

१. चेहऱ्याच्या उजव्या बाजूला वेदना होणे. एक वर्षापासून चमका मारल्यासारख्या वेदना उजव्या दाढेपासून ते उजव्या बाजूच्या मस्तकापर्यंत पोहोचणे. वेदना हळूहळू सुरू होतात आणि हळूहळू कमी होतात. बोलताना, जेवताना, स्पर्शाने, दात घासताना, थंड पाणी पिताना, चावताना वेदना वाढणे.

२. हृदयशस्त्रक्रियेच्या एक महिन्यानंतर वेदना सुरू झाल्या. २. कंबरदुखी १५ वर्षांपासून.

३. गुडघेदुखीचा त्रास १५ वर्षांपासून. चढउतार केल्यावर, गुडघ्यांवर बसल्यावर, उठता बसताना त्रास होणे. गुडघे दुखणे आणि सुजणे.

**विशेष माहिती:-**

१. तंबाखू, मिसरीची सवय. २. खाण्यात तिखट, आंबट पदार्थांची, मांसाहाराची आवड, तेलकट आणि आंबट पदार्थांमुळे त्रास होणे. ३. सकाळच्या वेळी चक्कर येणे. झोप न झाल्यामुळे, केस ओले राहिल्यावर डोकेदुखी सुरू होणे. मोकळ्या वाऱ्यात, उबदारपणामुळे बरे वाटणे. ४. चेहऱ्यावर खूप घाम येणे. ५. छातीवर दबाव येऊन घाम येणे. चालताना, चढताना दम लागणे. ६. सापांची व पाण्याची स्वप्न पडणे. ७. थंड प्रकृती.

**स्वभाव:-**

तुमच्या लहानपणाविषयी सांगा.

माझा जन्म एका खेडेगावात झालेला आहे. मला मैदानी खेळांची आवड होती. जे मिळाले त्यात मी समाधानी असे. अकरावीनंतर माझे लग्न एका रूढिप्रिय घरात झाले. त्यामुळे मला जॉब करण्याची मुभा नव्हती. पण मग मी शिलाईकाम, विणकाम करायला सुरुवात केली. माझे माझ्या घरातील सगळ्यांशी खूप छान पटत असे. जास्त करून माझ्या सासूबाईंशी. त्या मला आईसारख्या होत्या. माझे वडील माझ्या लहानपणीच वारले. त्यामुळे इतर मुलांचे त्यांच्या वडिलांकडून होणारे लाड बघितल्यावर मला गहिवरून येते.

**तुमच्या आयुष्यातील ताणतणावाचा प्रसंग कुठला?**

हा प्रश्न विचारताच त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. रडत रडत त्यांनी सांगितले की, जगण्याचे एकच ध्येय असलेल्या माझ्या मुलीचा ३ वर्षांपूर्वीच मृत्यू झाला. बी.कॉम.मध्ये नापास झाल्यावर ती खूप नैराश्यग्रस्त झाली. त्यातच तिला आकडी येऊ लागल्या आणि मेंदूत रक्तस्राव होऊन ती कायमची माझ्यापासून दूर गेली. तेव्हापासून मला हृदयविकाराचा त्रास होऊ लागला. दोन वर्षांपूर्वी माझ्या सासूबाई मरण पावल्या. मला अजूनही त्यांची खूप आठवण येते. आता मला माझ्या मुलांची खूप काळजी वाटत राहते. त्यांना घरी यायला उशीर झाला तर मी पटकन त्यांच्यावर चिडते आणि ओरडते. पण मी हे त्यांच्या काळजीपोटी करते.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व:-**

१. वेदना हळूहळू सुरू होणे आणि हळूहळू कमी होणे. २. वेदनामुक्त बाजूला झोपल्यावर, दाबाने, स्पर्शाने वेदना वाढणे. ३. खाण्यात मांसाहाराची, तिखट आणि आंबट पदार्थांची आवड. ४. सोबतीची गरज. ५. दडपला गेलेला राग. ६. धार्मिकवृत्ती ७. काळजीयुक्त स्वभाव. ८. उजवीकडून डावीकडे तक्रारी सुरू होणे. ९. शस्त्रक्रिया, तंबाखू, दुःख यांमुळे आजाराला सुरुवात होणे. १०. थंड प्रकृती. या लक्षणांवरून मी त्यांना होमिओपॅथिक औषध सुरू केले. एका आठवड्याचे औषध घेऊन त्या घरी गेल्या. पुढच्या आठवड्यात आनंदी होऊन त्यांनी मला सांगितले की आता त्यांना शांत झोप लागते आणि एकही वेदनाशामक गोळी न घेता दैनंदिन कामे त्या करू शकतात. एका महिन्याच्या फेरतपासणीत त्यांनी सांगितले की, माझी गुडघेदुखी आणि कंबरदुखीसुद्धा थांबलेली आहे. दीड वर्षे झाली त्यांचा हा Trigeminal Neuralgia चा त्रास पुन्हा उद्‌भवला नाही.

**पत्ता - आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल ॲण्ड फिलिंग सेंटर, तपोवन रोड, पिंपरी गाव, पुणे-१७. संपर्क - ०२०-६९३३७०८०, २७४१२५४९, २७४१२१९७**




**पाण्याशिवाय जीवन व्यर्थ आहे. जगण्याकरिता पाणी अत्यंत आवश्यक आहे. आपल्या शरीरात जवळ जवळ ७० टक्के पाणी आहे. यामुळेच चांगल्या आरोग्याकरता शरिराला मुबलक पाणी पुरवठा असणे आवश्यक आहे.**

## उत्तम आरोग्यासाठी पाणी पिणे लाभदायक



विशेषतः व्यायाम करताना तर याचा अत्यंत कटाक्षाने विचार करावयास हवा. साधारणतः शरिरास दररोज तीन-चार लिटर पाणी आवश्यक असते. यामुळेच वर्क-आउट अथवा कोणत्याही व्यायाम प्रकारात शरिरातून पाण्याचा निचरा हा जास्त होत असतो. व्यायाम करताना मधल्या वेळेत थोडे-थोडे पाणी पिणे आवश्यक असते. याचा निश्चित फायदा शरिरास होतो. स्नायुंना पाण्याचा पुरवठा झाल्यामुळे व्यायाम करताना त्यांना थकवा कमी प्रमाणात येतो. शरिरातील क्रॅंप येण्यास मज्जाव होतो. व्यायाम करताना शरिरात प्रोटिन्सचे अधिक सेवन होत असते. प्रोटिन्सच्या अधिक सेवनाने किडनी व यकृत यावर अतिरिक्त ताण पडत असतो. पाण्याचे प्रमाण वाढविल्यास प्रोटिन्स विरघळण्यास मदत होते. अनावश्यक भाग शरिरातून बाहेर पडण्यास मदत होते. शरिरातील इतर विषारी द्रव्येपण बाहेर फेकण्यास मदत होते. यामुळेच पाणी मुबलक पिणे हा चांगल्या आरोग्याचा कानमंत्र आहे. पाणी पिल्याने शरिराची कांती पण तजेलदार होते.

# ‘डायल १०८’ रुग्णवाहिका सेवा जनजागृतीसाठी प्रात्यक्षिकांचे सादरीकरण

## एकूण ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**पुणे : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने आणि ‘बीव्हीजी इंडिया लिमिटेड’ या सेवाक्षेत्रातील कंपनीच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या ‘महाराष्ट्र इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिसेस’च्या सुसज्ज ‘डायल १०८’ सेवेच्या जनजागृतीसाठी प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. ‘डायल १०८’ सेवेबाबत विद्यार्थ्यांना माहिती मिळणे या प्रमुख हेतूने डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रीसर्च पिंपरी, पुणे आणि एस. पी. कॉलेज येथे आयोजित या अभियानांतर्गत एकूण तीनशे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे ‘डायल १०८’ सेवेच्या कार्याची माहिती देण्यात आली.

डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रीसर्च, पिंपरी, पुणे येथे ‘डायल १०८’ सेवेच्या जनजागृतीसाठी प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. एम. डी. मोहिते, मनीषा पवार, अर्जुन काळे, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

एस. पी. कॉलेज येथे ‘डायल १०८’ सेवेच्या जनजागृतीसाठी प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप शेठ, डॉ. विलास उगळे, मंगेश चव्हाण, कुणाल चोरमले, किरण आंधळे आणि २०० राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते. अपघात, हृदयविकार, भोवळ येणे, अर्धांगवायू, विषबाधा, आगीत भाजणे अशा अनेक प्रकारच्या आपत्कालीन स्थितीमध्ये ही रुग्णवाहिका बोलावता येते. याबाबत माहिती देऊन विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके दाखविण्यात आल्याची माहिती इमर्जन्सी सेवेचे मुख्य संचालन अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर शेळके यांनी दिली.



या जनजागृती प्रात्यक्षिकाचे संयोजन विभागीय व्यवस्थापक डॉ. विनय यादव, जनजागृती विभागप्रमुख साहेबराव इंगळे, सहायक जिल्हा व्यवस्थापक अतुल फडतरे, निरीक्षक दीपक पवार, इमर्जन्सी रिस्पॉन्स सेंटरचे व्यवस्थापक डॉ. प्रवीण साधले, जिल्हा व्यवस्थापक डॉ. भूषण सोमवंशी, सहायक जिल्हा व्यवस्थापक राहुल गांधले यांनी केले होते.

# पाइल्स, हर्नियावर सवलतीच्या दरात उपचार शिबिर

**पुणे : प्रतिनिधी**

पाइल्स, कॉन्स्टिपेशन, व्हेरिकोस व्हेन्स व हर्नियापासून कायमची सुटका करून देणाऱ्या तंत्रज्ञानावर आधारित उपचार पुरविणाऱ्या हिलिंग हँड्स क्लिनिकतर्फे स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने फ्रीडम वीक (स्वातंत्र्य सप्ताह शिबिर) साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत १४ ते १८ ऑगस्ट या कालावधीत रोगाचे प्राथमिक निदान मोफत, तर औषधे व शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

हिलिंग हँड्स क्लिनिकतर्फे गेली पाच वर्षे या सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. खेड्यापाड्यातील हजारो नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेतला असून, त्यांची विविध आजारांपासून सुटका झाली आहे. याच उपक्रमांतर्गत हिलिंग हँड्स क्लिनिकचे संस्थापक डॉ. अश्विन पोरवाल स्वतः रुग्णांची तपासणी करणार आहेत. डॉ. पोरवाल म्हणाले, शेतकऱ्यांमध्ये सर्वसामान्यतः हर्नियाचा आजार आढळतो, तर दीर्घकाळ उभे राहून काम करणाऱ्या वाहतूक पोलीस आणि शिक्षकांमध्ये व्हेरिकोस व्हेन्सचा आजार आढळतो. शहरी भागांसह ग्रामीण भागात अशा आजारांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे मूळव्याध, बद्धकोष्ठता, हर्नियासारख्या आजारांबाबत लोकांना पूर्ण माहिती देणे आणि ते आजार कसे टाळावेत याबाबत फ्रीडम वीकमध्ये मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हिलिंग हँड्स क्लिनिकची विशेष ॲम्ब्युलन्स या सप्ताहाच्या कालावधीत पुणे जिल्ह्यात चाकण, खेड, नसरापूरसह विविध गावांमध्ये फिरविण्यात येणार आहे. त्यामुळे पुण्यातील क्लिनिकमध्ये येऊ न शकणाऱ्या लोकांना त्यांच्याच गावामध्ये सर्व चाचण्यांची सुविधा उपलब्ध होणार आहे, असेही पोरवाल यांनी सांगितले.

## शब्दनगरी

मंगळवार, ११ ऑगस्ट २०१५ पुण्य नगरी **शब्दनगरी**



### आडवे शब्द

१. देवआनंद व नूतन यांचा एक चित्रपट
८. देवआनंद व साधना यांचा एक चित्रपट
१३. एखाद्याच्या मृत्यूनंतरचे अनेकांचे रडणे
१४. कळ, तिडीक, हुक्की, लहर
१५. पंच, मध्यस्थ
१६. नारळाचे झाड
१७. केर, गाळसाळ, घाण
१९. नंतर, थोड्या वेळाने
२०. छताच्या काठाला जोडतात ती चुण्या असलेली कापडी पट्टी
२१. चक्र
२३. शोभिवंत रचना, डामडौल, शान
२४. जुंपलेल्या बैलाच्या गळ्याभोवतालचा पट्टा
२६. विहीर, बावडी
२७. रंगविण्याचा धंदा करणारा
२९. सैन्याची शिस्तबद्ध हालचाल, परेड
३१. पाण्याचा पाट
३३. पुष्परस, मकरंद
३५. उष्ण, कढत
३६. रुपे, रजत
३७. ‘अशी ही बनवाबनवी’ या चित्रपटातील चष्मेवाली घरमालकीन
३९. पराभव, फुलांची माह
४०. तक्रार, न्याय, दुजोरा, दखल
४१. अडीच डझन वस्तूंची संख्या
४२. सातारा जिल्ह्यातील एक थंड हवेचे ठिकाण
४४. धुंदी, गुंगी, कैफ
४६. ‘दक्षिणेची कोकिळा’ म्हणून प्रसिद्ध असलेली एक गायिका
५०. एक बारीक सुगंधी फूल
५१. दिवसाची लांबी, काळवेळ
५३. होम, यज्ञ, अग्नित आहुती टाकणे
५४. मौजेने फिरायला जाणे, पर्यटन
५५. देवांचा किंवा ऋषीचा क्रोध, संताप
५७. दमयंतीचा पती
५८. हिंदुस्थान युनिलिव्हर कंपनीचा एक वॉशिंग पावडर ब्रॅण्ड
५९. ओडिशामधील एक नदी
६०. सगळे, सकल, समस्त
६१. एक हिंदी चित्रपट- *** नमस्ते
६३. झाडाची पाने, पाचोळा
६४. तीन चतुर्थांश भाग
६५. निकाल, फैसला, तड, सोक्षमोक्ष
६७. हार, पराभव
६९. डोळा, चक्षू, लोचन
७०. डाळिंब (हिंदी)
७१. रत्न (हिंदी)
७२. रिकामा, रिक्त
७३. बुटका, ठेंगू, विष्णूचा एक अवतार
७५. बैलांच्या शिंगास बांधायची दोरी
७८. अभिनेता सैफअली खानची वारसा हक्काने मिळालेली एक पदवी
७९. घोडा, हय
८०. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील ‘सायमन गो बॅक’ चे मराठी रुप
८२. स्वाक्षरी, हस्ताक्षर
८३. स्वर्ग (उर्दू)
८४. नेहमी, निरंतर, नित्य
८५. विचार, मसलत, उपदेश
८६. कोल्हा काकडीला ** (म्हण)

### उभे शब्द

१. ‘थोडे दिवस भपका दाखवून एखाद्याचे काम थांबणे’ या अर्थाची म्हण
२. यमाचे वाहन, हल्या
३. गृह, सदन
४. रडकहाणी, रडगाऱ्हाणे
५. बायकोचा किंवा नवऱ्याचा बाप
६. धान्य मोजण्याचे एक जुने माप
७. मान, गळा (इंग्रजी), प्रामाणिक
८. वेगळा, निराळा, आगळा (हिंदी)
९. एक अणि पाव मिळून होणारी संख्या
१०. घोडा, उंट, इ. ची विष्ठा
११. जास्तीत जास्त, उच्च मर्यादा, पराकाष्ठा
१२. पुढारी, नेता (इंग्रजी)
१८. प्रकाश भेंडे व जयश्री टी. यांचा एक चित्रपट
१९. बुद्धी, अक्कल, ज्ञानशक्ती
२०. वृक्ष, तरु
२२. नदीचा तीर, दरड (उर्दू)
२४. दुधावरची मलई
२५. नाश, पात, पडणे (संस्कृत)
२६. अक्षयकुमार, सुनील शेट्टी व अफताब यांचा एक चित्रपट
२८. कागदाचे २० दस्त्यांचे माप
३०. वाद घालणारा, फिर्यादी
३१. लोखंड घासून साफ करण्याचे हत्यार
३२. वेल, वल्लरी
३३. जास्त किमतीचे, स्वस्त नसलेले
३४. पृथ्वी, अवनी, धरती
३८. अनाथ, पोरका (उर्दू)
४०. वणवा, दावाग्नी
४३. ओरखडा, बोचकुरा
४५. एक हिंदी गायक, अमिताभचा एक चित्रपट
४७. विषारी, विखारी, जहरी (हिंदी)
४८. मुसलमान
४९. जंगल, वन, शेतातील तण
५०. एक नाटक- जागो *** प्यारे
५२. आदरातिथ्य, मानपान
५४. गंध उगाळण्याचा दगड
५५. भालचंद्र नेमाडे यांची एक कादंबरी
५६. मोठी डोंगरांची रांग
५९. मृदू, नरम
६२. निष्काळजीपणा बेपर्वा, हलगर्जी (हिंदी)
६३. बुडत्याचा पाय खोलात (म्हण)
६४. योग्य, लायक, नाटकातले सोंग
६६. रामगोपाल वर्मा दिग्दर्शित अमिताभचा एक चित्रपट
६८. लोक, परकी माणसे
६९. पुढारी अग्रणी, म्होरक्या
७०. एक आंबट गोड चवीचे फळ
७२. लाच (हिंदी)
७३. मुदतीविषयीचा करार, वचन
७४. माझे (संस्कृत)
७६. एक डझन अधिक पाच मिळून?
७७. गोविंदाचा एक चित्रपट
७८. शीर, नाडी
७९. मानवाच्या तीन मूलभूत गरजांपैकी पहिली
८०. सासू (हिंदी)
८१. जाण्याचे अपेक्षित स्थळ, आटोका, अंतर, पोच

### कालच्या शब्दनगरीचे उत्तर



# रुग्णांकडून कुष्ठरोग्यांचे ड्रेसिंग

**पुणे : प्रतिनिधी**

कोंढवा येथील डॉ. बंदोरवाला या कुष्ठरोग्यांच्या हॉस्पिटलमध्ये कुष्ठरोगी रुग्णांवर ड्रेसिंग करणाऱ्या रुग्णांना रोजगार मिळत असल्याचे सांगून रुग्ण करत असलेल्या ड्रेसिंगचे समर्थन कुष्ठरोग आणि क्षयरोग विभागाचे सहसंचालक डॉ. संजीव कांबळे यांनी केले आहे. यामुळे सध्या तरी येथील रुग्णांवर रुग्णांकडूनच ड्रेसिंग करण्यात येणार असल्याचे दिसून येत आहे.

हॉस्पिटलमध्ये कुष्ठरोग्यांच्या जखमावर ड्रेसिंग करणाऱ्या कर्मचाऱ्यांची पाच पदे मंजूर आहेत. मात्र सध्या केवळ एकच पद भरले गेलेले आहेत तर बाकीची चार पदे रिक्त आहेत. येथे दररोज पन्नास ते साठ रुग्णांच्या जखमांवर ड्रेसिंग करावे लागते. यासाठी एकच ड्रेसर कर्मचाऱ्याला या सर्व रुग्णांवर उपचार करणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांना मदत म्हणून बरे झालेले रुग्णच रुग्णांची ड्रेसिंग करत असल्याचा प्रकार दैनिक पुण्यनगरीने उघडकीस आणला होता. हे पदे कधी भरणार याबाबत कुष्ठरोग आणि क्षयरोग विभागाचे सहसंचालक डॉ. संजीव कांबळे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी या रुग्णांना ड्रेसिंग करण्याचा रोजगार मिळत असल्याचे सांगितले. तसेच सध्या हे रिक्त पदे कधी भरण्यात येणार याविषयीही काही सांगितले नाही. परंतु नियमानुसार या रुग्णांना बाह्यरुग्ण विभागाची सेवा करण्यास परवानगी आहे. मात्र तरीही त्यांच्याकडून ड्रेसिंग केले जात आहे.

**सहसंचालकांकडून समर्थन**

डॉ. बंदोरवाला रुग्णालयाची क्षमता ३५० खाटांची आहे. या रुग्णालयात सध्या जवळपास १८० रुग्ण हे कुष्ठरोगावर उपचार घेत आहेत. त्यापैकी ६० ते ७० टक्के हे पुरुष तर उरलेले महिला रुग्ण आहेत. यातील जवळपास पन्नास रुग्णांच्या हाताला व पायाला जखमा होतात आणि त्या जखमा बऱ्या होण्यासाठी त्यांना दररोज पट्टी (ड्रेसिंग) बांधावी लागते. येथे जवळपास ५० रुग्णांचा स्वीकार त्यांचे घरचे आणि समाज करत नसल्याने त्यांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. त्यांना त्यांच्या क्षमता आणि कौशल्यानुसार काम देण्यात येते आणि त्याचा मोबदलाही देण्यात येतो. यामध्ये त्यांना शेतमजुरी, वायरमन, टपाल कारागिर, व्रणोपचार सेवक शिंपी सेवक, गुराखी सेवक बाह्यरुग्ण सेवा यांना प्रत्येकी ४० रुपये रोजंदारी देण्यात येते. तर मुकादम, गवळी आणि ट्रॅक्टरचालक यांचे काम कौशल्यपूर्ण असल्याने त्यांना १०० रुपये रोजंदारी देण्यात येते. बाह्य रुग्ण विभागातील रुग्णांची सेवा करण्यासाठी रुग्णांना रोजगार देण्यात येतो मात्र त्यांनी ड्रेसिंग करणे अपेक्षित नाही. तरीही रुग्णांनाच ड्रेसिंग करावे लागते आहे. यापैकी २० रुग्ण आवारातील शेतीचे काम करतात आणि त्यातून उत्पन्न घेतात. यातील बाह्यरुग्ण सेवा करणाऱ्या काही रुग्णांकडून या रुग्णांची सेवा करण्यात येते तसेच ड्रेसिंग करण्यात येते.